follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासाचीं

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड


www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक ३९५ सातारा * रविवार दि २१ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

## थोडक्यात

### उजनीचा पाणीसाठ्याचे अर्धशतक



टेंभूर्णी पाणी साठवण क्षमतेत महाराष्ट्रात सर्वात मोठ्या असलेल्या उजनी धरणानी चालू हंगामात तळ गाठून वजा ५९.९९ टक्के म्हणजेच ३१.५२ टीएमसी इतकी पाणीपातळी खालावली होती. दौंड मधूनच मागील ७ जूनपासून पाणी जमा होऊ लागल्याने उजनीचा एकूण पाणीसाठा वजा ५०.८९ टीएमसी झाला असून धरणात वजा २३.८३ टक्के झाला आहे तर धरणातील पाणीपातळी प्लसमध्ये येण्यासाठी आणखीन १२.७० टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे.तर धरण पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी आणखीन जवळपास ७० टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. यातच मागील चार दिवसांपूर्वी २१ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग दौंड मध्ये येण्यास सुरुवात झाली होती.

परंतु दुस-याच दिवशी पुणे, लोणावळा,व भीमा खोऱ्यातील भागात पडणाऱ्या पावसाने उघडीप दिल्याने दोन मध्ये येणारा विसर्ग घटला होता. तर आज पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने आज सकाळी दौंड मधून ४७७९ क्युसेक ने येत असलेल्या विसर्गात वाढ होऊन सायंकाळी सहा वाजता ६७८० क्युसेक ने येत आहे. तर उजनी धरण आणखीन मायनस मध्येच असल्याने नदीकाठच्या व डावा उजवा कालव्याच्या लाभक्षेत्रातील उस लागणी खोळंबल्या असून शेतकऱ्यांच्या नजरा भीमा खोऱ्यातील सर्व धरणातील पाणीसाठ्याकडे आहेत तर काही धरणे ५० टक्केच्या पुढे गेली आहेत. वरील धरणे शंभर टक्के भरली आणि पुणे परिसर,मावळ व भीमा खोऱ्यात पाऊस पडला तर मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग उजनी मध्ये येऊन उजनीच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत असते.

पावसाची संततधार कायम राहून उजनीच्या पाणीपातळीत वाढ व्हावी या आशेवर सोलापूर जिल्हा परिसरातील शेतकरी आहेत. २०/७/२०२४ उजनी अपडेट - एकूण पाणीसाठा ५०.८९ टिएमसी उपयुक्त पाणीसाठा टिएमसी वजा १२.७०/ एकूण पाणी पातळी वजा २३.८३ टक्के दौडमधून येणारा विसर्ग - ६७८०

# विदर्भात पावसाचा हाहाकार!

## अनेक मार्ग बंद, जनजीवन विस्कळीत, धरणांच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ

**मुंबई :** विदर्भात मुसळधार पावसानं थैमान घातलं आहे. अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुसळधार पावसामुळं अनेक ठिकाणचे रस्ते बंद झाल्याचं पाहाला मिळत आहे. विदर्भातील नागपूर, भंडारा गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यात पावसाचा जोर अधिक असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.



गडचिरोली जिल्ह्यात सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळं अनेक मार्ग बंद झाले आहेत. चामोर्शी तालुक्यातील चांदेश्वर ते येणापूर या मार्गावरील एका पुलावरून अचानक पाण्याच्या पातळीवर वाढ झाल्याने शेतात कामासाठी गेलेले लोक अडकले होते. मात्र, परत घराकडे येण्यासाठी पुलावरील पाण्याच्या प्रवातून आपल्या बैलांना घेऊन जीवघेणा प्रवास त्यांना करावं लागेल आहे. अनेक वर्षांपासून या मार्गावरील पुलाची मागणी गावकरी करत आहेत पुलाची अवस्था दयनीय झाली आहे. मात्र प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने प्रत्येक वर्षी पावसाळ्यात अशाप्रकारे या भागातील नागरिक पाण्यातून जीवघेणा प्रवास करावं लागतोय.

गोसीखुर्द धरणाच्या पाण्याच्या विसर्गात मोठी वाढ

मुसळधार पावसामुळं गोसीखुर्द धरणाचे सर्वच्या सर्व ३३ दरवाजे उघडण्यात आलेत. ३३ गेट पैकी २३ गेट एक मीटरनं तर, १० गेट अर्ध्या मीटरनं आता सुरू करण्यात आली आहे. आता धरणाच्या या संपूर्ण ३३ गेटमधून २ लाख १३ हजार ७९१ पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे. काल धरण प्रशासनानं ३३ गेट पैकी १३ गेट एक मीटरनं तर, २० गेट अर्धा मीटरनं सुरू करून त्यातून १ लाख ७७ हजार ३५३ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू केला होता. त्यानंतर त्यामध्ये ३६ हजार ४३८ इतका क्युसेक पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे.



### गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पाऊस


**गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड आणि कुरखेडा या भागात प्रचंड पाऊस झाला आहे. भामरागडमध्ये १०३ मि.मी, तर कुरखेडा येथे सुमारे ११६ मि.मी. इतका पाऊस झाला आहे. गडचिरोली जिल्हाधिकार्यांशी मी सातत्याने संपर्कात असून, नियंत्रण कक्षातून संपूर्ण परिस्थितीवर काटेकोरपणे लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कुठलीही आपातकालिन स्थिती उदभवल्यास एसडीआरएफच्या ३ चमू सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. भामरागडमध्ये बाजारपेठेपर्यंत पाणी शिरले असून, तेथून नागरिकांच्या स्थलांतरणाची कार्यवाही प्रारंभ करण्यात आली आहे. पर्लकोटा नदीचा पूल पाण्याखाली गेला आहे. सिरोंचाकडे जाणार्या रस्त्यांसह सुमारे २७ रस्त्यांवरील वाहतूक प्रभावित झाली आहे. गोसिखुर्द धरण आणि चिचडोड बॅरेजचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. जेथे पुलावरुन पाणी वाहते आहे, तेथे सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत.**

**चंद्रपूरमध्येही मुसळधार पाऊस**

चंद्रपूर जिल्ह्यातही मुसळधार पाऊस सुरु आहे. अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. चिमूर तालुक्यात दोन जण नाल्यातील पाण्यात दुचाकी वाहून गेल्याने पुराच्या पाण्यात अडकले होते. शिरपूर-बोधली येथे नाल्याचं पाणी रस्त्यावरून जात असताना देखील दोघजण जात होते. पावामुळं ईरई धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. इरई धरणाचे ७ दरवाजे १ मीटरने खुले करण्यात आले आहेत.

# नवीन महाबळेश्वरसाठी प्रारूप विकास योजनेची तयारी सुरु

## २३५ गावांचा बेस मॅप तयार



**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणाच्या शेजारीच नवीन महाबळेश्वर गिरिस्थान निर्माण करण्याच्या प्रकल्पाने गती घेतली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या प्रकल्पातील २३५ गावांचा बेस मॅप तयार केला आहे. आता या भागाची प्रारूप विकास योजना तयार करण्याचे काम सुरू झाले असून येत्या काही महिन्यांत ही विकास योजना तयार केली जाणार आहे.

राज्यातील प्रमुख गिरिस्थानांमध्ये समावेश असलेल्या महाबळेश्वरला पर्यटकांची मोठी पसंती असते. त्यातून येथील पर्यटकांची गर्दी वाढू लागल्याने महाबळेश्वरवर येणारा ताण कमी करण्यासाठी नवीन गिरिस्थान विकसित करण्याची गरज निर्माण झाली होती. त्यानुसार कोयना बॅक वॉटर आणि परिसरातील तब्बल २३५ गावांचा विकास साधून नवीन महाबळेश्वर वसविले जाणार आहे.

यामध्ये सातारा तालुक्यातील ३४, पाटण तालुक्यातील ९५, जावळी तालुक्यातील ४६ आणि महाबळेश्वर तालुक्यातील ६० गावांचा समावेश नवीन महाबळेश्वर प्रकल्पात करण्यात आला आहे. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी 'एमएसआरडीसी'ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून २०१९ मध्ये नियुक्ती केली होती.

सातारा जिल्ह्यातील सुमारे ७४८ चौरस किमी क्षेत्रासाठी ही योजना तयार केली जात असून, सांगली जिल्ह्याच्या हद्दीपासून ते महाबळेश्वरपर्यंत हा परिसर विस्तारला आहे.

**'एमएसआरडीसी'ने या भागाचा बेस मॅप तयार केला आहे. आता या भागातील नागरिक, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या सूचना घेतल्या जाणार आहेत. या सूचनांच्या विचारात घेऊन विकास योजना तयार केली जाणार आहे. त्यातून ती सर्वसामावेशक बनण्यास मदत मिळेल, असे 'एमएसआरडीसी'च्या अधिकाऱ्यांनी नमूद केले. दरम्यान, स्थानिकांना त्यांच्या सूचना मांडता याव्यात, यासाठी महाबळेश्वर आणि जावळी तालुक्यात २२ जुलैला, तर सातारा आणि पाटण तालुक्यात ३ जुलैला तालुकानिहाय गावांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले**

नवीन महाबळेश्वरमधील परिसर हा सह्याद्री डोंगररांगांच्या उत्तर दक्षिणेला समुद्र सपाटीपासून सुमारे १२०० मीटर उंचीवर आहे. या भागातून सोळशी, उरमोडी, कांदाटी या उपनद्या वाहतात. तसेच कोयनेचे बॅक वॉटर आहे. यामुळे हा परिसर हिरवागार आणि नयनरम्य आहे. त्याचबरोबर घनदाट जंगल, वन्यजीव, धबधबे, तलाव, ऐतिहासिक वास्तू यांची मोठी देण लाभली आहे. या भागातील पर्यटनस्थळांच्या परिसरात सोयीसुविधांचा विकास करून पर्यटनाला चालना दिली जाणार आहे. यातून या भागाचा विकास साधण्याचा 'एमएसआरडीसी'चा मानस आहे.

# महाविकास आघाडी दुटप्पी असल्याचा रावसाहेब दानवे यांचा आरोप

**मुंबई :** महाविकास आघाडीचे आमदार सभागृहात बोलताना शासकीय योजनांवर टीका करतात आणि आपल्या मतदारसंघात मात्र या योजनांची माहिती देणारे होर्डिंग लावतात. ही विरोधकांची दुटप्पी भूमिका आहे, असा शब्दात भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला.

महायुती सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात महिला, युवक, शेतकरी अशा अनेक समाज घटकांसाठी कल्याणकारी योजनांचा समावेश आहे. अनेक विकासकामांचा उल्लेख आहे. महाविकास आघाडीचे नेते आपल्या मतदारसंघात या योजनांचे होर्डिंग लावतात आणि सभागृहात मात्र त्यावर टीका करतात, असे रावसाहेब दानवे म्हणाले.

महाविकास आघाडीत काहीही आलबेल नाही

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत सकाळी उठून उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होणार असल्याचे सांगतात. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील त्यांना शांत करतात. तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि भावी मुख्यमंत्री नाना पटोले गळ्यात रुमाल अडकवून आणखी काही वेगळेच बोलतात. सांगली लोकसभा मतदारसंघावरून किती वादविवाद झाले ते सगळ्यांनी बघितले आहेत. अखेर या मतदारसंघात काँग्रेसने बंडखोरी केली. यांच्यावर जनतेने विश्वास कसा ठेवायचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीत काहीही आलबेल नाही, अशा शब्दात दानवे यांनी महाविकास आघाडीला शालजोडीतून टोले लगावले.

# कार्यकाळ संपण्याआधीच UPSC चे अध्यक्ष मनोज सोनी यांचा राजीनामा

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी मनोज सोनी यांच्या नियुक्तीवर प्रश्न उपस्थित केला होता. सोनी यांची यूपीएससी अध्यक्षपदी नियुक्ती म्हणजे संविधानावर हल्ला असल्याचे राहुल यांनी म्हटले होते. त्यांनी सोनी यांचे आरएसएसशी असणाऱ्या संबंधांवरही भाष्य केले होते. मनोज सोनी हे युपीएससीचे अध्यक्ष होणे म्हणजे यूपीएससी केंद्रीय लोकसेवा आयोगाऐवजी केंद्रीय प्रचारक संघ आयोग होईल, अशी टीका राहुल गांधी यांनी केली होती.

नवी दिल्ली: केंद्रीय लोकसेवा आयोगातून महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. युपीएससीचे अध्यक्ष मनोज सोनी यांनी कार्यकाळी पूर्ण होण्याआधीच राजीनामा दिला आहे. सोनी यांनी आपला राजीनामा राष्ट्रपतींकडे पाठवला आहे. वैयक्तिक कारणांमुळे सोनी यांनी राजीनामा दिल्याची आहे. जूनच्या शेवटच्या आठवड्यातच त्यांनी राजीनामा दिला. सध्या तरी त्यांचा राजीनामा स्वीकारल्याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

मनोज सोनी यांचा कार्यकाळ २०२९ मध्ये संपणार होता. पण त्यापूर्वी त्यांनी राजीनामा दिल्याने चर्चा सुरू झाल्या आहेत. सोनी २०१७ मध्ये णझडउ सदस्य



म्हणून रुजू झाले. १६ मे २०२३ रोजी त्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष बनवण्यात आले.

दरम्यान, मनोज सोनी यांना गुजरातमधील स्वामिनारायण पंथाची शाखा असलेल्या अनुपम मिशनसाठी अधिक वेळ द्यायचा आहे. २०२० मध्ये त्यांनी दीक्षा घेतली होती. २००५ मध्ये ते देशातील सर्वात तरुण विद्यापीठाचे कुलगुरू बनले. तीनवेळा कुलगुरू राहिलेल्या डॉ. सोनी यांनी वैयक्तिक कारणांमुळे राजीनामा दिल्याचे म्हटले जात आहे.

मनोज सोनी हे पंतप्रधान मोदींचे निकटवर्तीय मानले जातात. मोदींनी २००५ मध्ये सोनी यांची वडोदराच्या एमएस युनिव्हर्सिटीच्या कुलगुरूपदी नियुक्ती केली होती. नियुक्तीवेळी सोनी यांचे वय अवघे ४० वर्षे होते.

# जिल्ह्यातील ७५ बंधारे पाण्याखाली

## राधानगरी धरणातून १४५० क्युसेक विसर्ग

**कोल्हापूर :** जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून ७५ बंधारे पाण्याखाली गेले आहेत यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शिवाय अनेक गावातील वाहतुकीचे मार्ग बदलण्यात आले आहेत. पंचगंगा नदी पाणी पातळी ३६ फूटा वरून वाहत आहे. तर राधानगरी धरणात ६.०८ टीएमसी पाणीसाठा आहे. आज सकाळी ७ च्या अहवालानुसार राधानगरी धरणातून १४५० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

पंचगंगा नदीवरील- शिंगणापूर, राजाराम, सुर्वे, रुई, इचलकरंजी, तेरवाड, शिरोळ व रुकडी, ताम्रपर्णी नदीवरील- कुर्तनवाडी, चंदगड, हल्लारवाडी, न्हावेली, उमगाव, कोकरे व कोवाड वेदगंगा नदीवरील- म्हसवे, शेणगाव, गारगोटी, निळपण, वाघापूर, कुरणी, बस्तवडे, चिखली व करडवाडी हिरण्यकेशी नदीवरील - साळगांव, विलजी, ऐनापूर व गिजवणे, दुधगंगा नदीवरील- दत्तवाड, सिध्दनेर्ली, सुळकूड व बाचणी कडवी नदीवरील- भोसलेवाडी, कोपार्डे, शिरगाव, सवते सावर्डे व सरुड पाटणे, वारणा नदीवरील -चिंचोली, तांदूळवाडी, कोडोली, माणगाव, खोची व शिगाव भोगावती नदीवरील- हळदी, राशिवडे, सरकारी कोगे, शिरगाव व तारळे कुंभी नदीवरील- कळे, शेनवडे, मांडुकली व वेतवडे कासारी नदीवरील- येवलूज, पुनाळ तिरपण, ठाणे आळवे, कांटे, वालोली, बाजार भोगाव,पेंडाखळे, करंजफेण, कुंभेवाडी, सुसकेवाडी, नवलाचीवाडी-१ व नवलाचीवाडी-२ धामीण नदीवरील- सुळे, पनोरे व आंबर्डे घटप्रभा नदीवरील- हिंडगाव, कानडे-सावर्डे, आडकुर, तारेवाडी, कानडेवाडी, बिजूर भोगोली व पिळणी, तुळशी नदीवरील - बीड असे एकूण ७५ बंधारे पाण्याखाली आहेत.



आपल्या जिल्ह्यातील धरणांमध्ये पुढीलप्रमाणे पाणीसाठा आहे. राधानगरी ६.०८ टीएमसी, तुळशी २.२५ टीएमसी, वारणा २३.५४ टीएमसी, दूधगंगा १३.९५ टीएमसी, कासारी १.९६ टीएमसी, कडवी २.२३ टीएमसी, कुंभी १.६३ टीएमसी, पाटगाव ३.०६ टीएमसी, चिकोत्रा ०.७७ टीएमसी, चित्री १.५९ टीएमसी, जंगमहट्टी १.२२ टीएमसी, घटप्रभा १.५६ टीएमसी, जांबरे ०.८२ टीएमसी, आंबेआहोळ १.१८ टीएमसी, सर्फनाला ०.४६ टीएमसी व कोदे लघु प्रकल्प ०.२१ टीएमसी इतका पाणीसाठा आहे.

तसेच बंधाऱ्यांची पाणी पातळी पुढीलप्रमाणे आहे. राजाराम ३५.५ फूट, सुर्वे ३३.६ फूट, रुई ६३ फूट, इचलकरंजी ५८.३ फूट, तेरवाड ५२ फूट, शिरोळ ४२.६ फूट, नृसिंहवाडी ४१ फूट, राजापूर ३०.१ फूट तर नजीकच्या सांगली १४.९ फूट व अंकली १८.११ फूट अशी आहे.

# भारतीय फुटबॉल टीमला मिळाला नवा प्रशिक्षक

**मुंबई :** भारतीय फुटबॉल संघाला नवीन प्रशिक्षक (छ्शु उेरलह) मिळाला आहे. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने भारतीय फुटबॉल संघाच्या नव्या प्रशिक्षकाची घोषणा केली आहे. स्पेनच्या मॅनोलो मार्केझ यांच्यावर आता भारतीय फुटबॉल संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या फुटबॉल महासंघाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत मार्केझ यांची प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांच्याकडे कोचिंगचा अनुभव असून तो भारतीय फुटबॉल संघासाठी उपयुक्त ठरू शकतो.

भारतीय फुटबॉल टीमला मिळाला नवा कोच

स्पेनच्या मानोलो मार्केझ यांची भारतीय पुरुष फुटबॉल संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली असून ते इगोर स्टिमॅक यांची जागा घेईल. शनिवारी झालेल्या अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या (-खऋऋ) कार्यकारी समितीच्या बैठकीत मार्केझ यांची कोच म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. एआयएफएफने एका निवेदनात सांगितलं आहे की, समितीच्या दिवसाच्या आधीच्या बैठकीत वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय संघासाठी नवीन मुख्य प्रशिक्षकाच्या नियुक्तीवर चर्चा करण्यात आली आणि तत्काळ प्रभावाने या पदासाठी मनोलो मार्केझ यांची निवड करण्यात आली आहे.

# भाटघर धरणाच्या पाण्याच्या पातळीत वाढ ; खरीप पिकांसाठी पोषक वातावरण

**भोर -:** भाटघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची सततधार सुरू असल्याने धरणाच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. सद्यस्थितीला धरणात ४० टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी या दिवशी ३३ टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध होता. तर निरा देवघर धरणात सद्यस्थितीला २९.७ एवढा पाणीसाठा उपलब्ध असून गतवर्षी या दिवशी २९.१७ एवढा पाणीसाठा उपलब्ध होता.

भाटघर धरण परिसरात गेल्या २४ तासात १६ मि.मी. पावसाची नोंद झाली असून १ जून पासून ३२२ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे. तर निरा देवघर पाणलोट क्षेत्रात गेल्या २४ तासात ३४ मि.मी. पावसाची नोंद



झाली असून १ जून पासून ५७४ मिलिमीटर पाऊस पडल्याची नोंद झाली आहे.

दरवर्षीच्या तुलनेने यावर्षी उशिरा पाऊस सुरू झाला असला तरी भात लागणीसाठी पाऊस समाधानकारक आहे. खरीप हंगामातील सोयाबीन, चवळी, भुईमूग, घेवडा या पिकांनाही पोषक वातावरण तयार झाले असून ही पिके तरारली आहेत. यामुळे परिसरातील शेतकरी वर्ग समाधान व्यक्त करीत आहे.

गतवर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्याने धरणातील पाणीसाठा लवकरच कमी झाला होता. यामुळे उन्हाळ्यात परिसरातील नागरिकांना पिण्यासाठी पाण्याचा तुटवडा भासू लागल्याने स्थानिकांपुढे जलसंकट उभे राहिले होते.

यावर्षी उन्हाळ्यात स्थानिक नागरिकांना पिण्यासाठी पाणी अपुरे पडू लागल्याने त्यांच्या पुढे जलसंकट उभे राहिले होते.भाटघर प्रशासनाने असे जलसंकट उभे असतानाही धरणातून जोरदार विसर्ग सुरू ठेवला होता. भाटघर पुनर्वसन सेवा संघाने याची दखल घेत मे महिन्यात दोन वेळा आंदोलन केले होते. उन्हाळ्यात स्थानिक नागरिकांपुढे पुन्हा जलसंकट उभे राहू नये यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करावे अशी मागणी भाटघर पुनर्वसन सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यां कडून होत आहे.

# महायुतीचे पापपत्र प्रसिद्ध करून मुंबई काँग्रेसने फुंकले निवडणुकीचे रणशिंग

**मुंबई :** सत्तेतून पायउतार होण्यासाठी काही महिने शिल्लक असताना , महायुती सरकारने आर्थिक योजनेच्या घोषणा देत जनतेला फसविण्याचा काम सुरू केले आहे. मात्र त्यांनी केलेल्या मनमानी कारभाराची पोलखोल आता आम्ही करणार आहे. असे सांगत खासदार वर्षा गायकवाड यांनी शनिवारी मुंबई काँग्रेस कार्यालयातील पत्रकार परिषदेत महायुतीचे पापपत्र प्रसिद्ध केले. आता आम्ही या पापपत्राच्या माध्यमातून आगामी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले असल्याचेही खा. वर्षा गायकवाड यांनी यावेळी सांगितले.

लाडकी बहिण, लाडका भाऊ, असे सर्व लाडके योजनेत येत आहेत. मात्र अदाणी सारख्या अनेक लाडक्या मित्रांना दिलेले कंत्राट, मलाईच्या योजना आम्ही आता या पाप पत्रातून बाहेर काढत आहोत. धारावी पुनर्विकास आणि अदाणी हे



समीकरण अदाणी मित्रांनी इतके गुंतागुंतीचे करून ठेवले आहे की, अदाणी यांचे खिसे भरण्याचेच धारवीचे कंत्राट आहे असा आरोप खा. वर्षा गायकवाड यांनी केला.

लहान भाऊ मोठा भाऊ व जागांचे गणित पाहण्यापेक्षा महाराष्ट्र वाचविण्याचे काम आम्ही मित्रपक्ष करत आहोत असे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. आ. विश्वजित कदम, मा. आ. मधु चव्हाण , प्रवक्ते सचिन सावंत, आनंद शुक्ला, सुरेशचंद्र राजहंस, युवराज मोहिते आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# संभाव्य पूर परिस्थितीचा विचार करुन सतर्क रहा : जिल्हाधिकारी अमोल येडगे

**कोल्हापूर :** सध्या कोल्हापुरातील पंचगंगा नदीची पाणी पातळी इशारा पातळी जवळ म्हणजेच ३६ फुटांवर असून जिल्ह्यात पावसाचा जोर असल्यामुळे पाणी इशारा पातळीकडे सरकत आहे. संभाव्य पूर परिस्थितीचा विचार करुन प्रशासकीय यंत्रणेने सतर्क रहावे, अशा सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केल्या. तसेच पुराचे पाणी आलेल्या ठिकाणी नागरिकांनी वाहने घालू नयेत व स्वतःही जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात संभाव्य पूर परिस्थितीच्या अनुषंगाने नियोजन बैठक झाली, यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस, कोल्हापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, गृह विभागाच्या पोलीस उपअधीक्षक प्रिया पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता तुषार बुरुड, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे, कार्यकारी अभियंता स्मिता माने, कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, मुख्य अग्निशमन अधिकारी मनीष रणभिसे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, उपविभागीय अधिकारी हरीश धार्मिक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रसाद संकपाळ तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. इचलकरंजी महानगरपालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व जिल्हास्तरीय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.

यावेळी तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांच्याकडून तालुका निहाय पावसाचे प्रमाण, संभाव्य पूर परिस्थिती व केलेल्या नियोजनाची माहिती घेऊन सूचना केल्या. पूर परिस्थिती निर्माण झाल्यास व्यक्ती आणि जनावरांचे वेळेत स्थलांतर करण्यासाठी तसेच त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरवण्यासाठी चोख नियोजन करा. निवारा व्यवस्था तयार ठेवा. कोणत्याही परिस्थितीत जिवीत हानी होणार नाही याची दक्षता घ्या, अशा सूचना करुन मान्सून परिस्थितीत सर्व विभाग प्रमुखांनी मुख्यालय सोडू नका, असे निर्देश दिले.

आपत्कालीन विभागाने उपलब्ध सर्व साधनसामग्री सज्ज ठेवावी. जिल्ह्यातील स्वयंसेवकांची पथके व एनडीआरएफ चे पथक सज्ज ठेवावे. नागरिकांना पुरस्थितीतून बाहेर काढण्यासाठी प्रशिक्षित बचाव पथके तयार ठेवा. मान्सून काळात रस्ते व पूल पाण्याखाली जातात, अशावेळी नागरिकांकडून पूल ओलांडताना दुर्घटना घडू नये, यासाठी पुराचे पाणी आलेले रस्ते बॅरिकेड्स लावून बंद करा व या मार्गावरील वाहतूक तात्काळ पर्यायी मार्गाने वळवा. पूरपरिस्थितीमुळे बाधित होणाऱ्या गावांतील नागरिकांपर्यंत व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे तात्काळ माहिती पोहोचवा. वीज पुरवठा खंडित झाल्यास त्वरित पूर्ववत करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री तयार ठेवा.

पूर परिस्थितीमुळे पाण्याचा वेढा पडण्याची शक्यता असणाऱ्या गावांना मदतकार्य जलद पोहोचवा. स्थलांतरित नागरिकांसाठी पुरेसे अन्नधान्य व औषधसाठा उपलब्ध ठेवा. पूरस्थितीत एकही जनावर वाहून जाऊ नये, यासाठी चोख नियोजन करा. छावणीतील जनावरांसाठी पुरेसे पशुखाद्य, ओला व सुका चारा, औषधसाठा तयार ठेवा, अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. येडगे यांनी केल्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस यांनी तालुका निहाय व गाव निहाय केलेल्या आपत्ती व्यवस्थापनाची माहिती दिली.



**बाजीप्रभू देशपांडे पुतळ्यास पुष्पहार अर्पण कार्यक्रमवेळी उपस्थित माजी नगराध्यक्ष विजय पाटील, असिफ मोकाशी, अमर आडके व मान्यवर**

# मैत्रेय प्रतिष्ठानच्या पावनखिंड संग्राम स्मृती पन्हाळगड : पावनखिंड रात्र मोहीमस प्रारंभ

**पन्हाळा :** संतधार कोसळणारा पावसात दाट धुक्याने वेढलेला पन्हाळगड... वेळ रात्रीची... अंगात रेनकोट... हातात काठी, मुखात जय शिवाजी... जय भवानी, बाजीप्रभू देशपांडे की जयचा घोष करत तीन दरवाज्या शेजारील बाजीप्रभू चौकात जमलेल्या तरुण-तरुणी.यामुळे अवघा पन्हाळा शिवमय झाला होता. निमित्त होते मैत्रेय प्रतिष्ठानच्या पावनखिंड संग्राम स्मृती पन्हाळगड -पावनखिंड बेचाळीसाव्या रात्र मोहीमेचे.

माजी नगराध्यक्ष विजय पाटील, असिफ मोकाशी, मैत्रेय प्रतिष्ठानचे संस्थापक अमर आडके यांच्या प्रमुख उपस्थितीत बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून जय शिवाजी... जय भवानी च्या अखंड गजरात भगवा झेंडा दाखवून मोहिमेस सुरवात करण्यात आली.

पन्हाळगडाच्या वेढ्यातून सुटण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज आषाढ शुद्ध पौर्णिमेला रात्रीच्या पहिल्या प्रहरी पन्हाळगडावरून बाहेर पडले होते.

त्यावेळी मावळ्यांच्या साथीने रात्रभर अखंड चालत दिवस उगवायला पांढरे पाण्यापर्यंत पोचले होते. पण यावर्षी विशाळगड घडलेल्या प्रकारमुळे या मोहीमेचा शेवट पांढरे पाणी येथील छत्रपतींच्या ऐतिहासिक फरसबंद वाटेवर इतिहास अभ्यासक डॉ अमर अडके यांच्या कथनाने होणार आहे .

## माजी सैनिक संघाकडून शिलान्यासाची जागा बदलण्याची मागणी

**सावळज :** (ता. तासगाव) येथील सावळज ग्रामपंचायतीने क्रांतीदिनानिमित्त अयोग्य ठिकाणी शिलान्यास बांधून शहिदांचा अपमान केल्याबाबत सांगली जिल्हा भारतीय माजी सैनिक संघाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. शिलान्यास योग्य ठिकाणी बांधण्याची मागणी केली आहे अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा माजी सैनिक संघाने दिला आहे.

देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी ज्यांनी प्राणाची आहुती दिली जे शहीद झाले त्यांचे स्मरण करण्यासाठी व त्यांचा सन्मान व्हावा यासाठी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने मिट्टी को नमन, विरों को वंदन या शासनाच्या उपाक्रमांतर्गत प्रत्येक गावात शहीद शिलान्यास बनविण्याचे आदेश ग्रामपंचायतींना दिले होते. त्यानुसार सावळज ग्रामपंचायतीने बांधलेल्या शहीद जवान शिलान्यासाच्या जागेवरून वाद निर्माण झाला होता.

सावळज येथील शिलान्यासाची जागा बदलण्यात आली नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे

# दत्त निवडणूक १८ जागांसाठी २५ उमेदवार रिंगणात

## सत्ताधारी गटाकडून तीन बिनविरोध होणार घोषणा

**शिरोळ :** येथील श्री दत्त साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकी साठीअर्ज माघारीचे अंतिम दिवशी १८ जागेसाठी २५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत सत्ताधारी गटाकडून नव्या ४चेहऱ्याला संधी देण्यात आली आहे तर सत्ताधारी गटाचे विद्यमान १४ संचालकांना पुन्हा संधी मिळाली आहे २४ जुलै रोजी मतदान होणार असून ६७ मतदान केंद्रावर ११५ गावातील २६७२६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत

दरम्यान सत्ताधारी गटाचे तीन उमेदवार बिनविरोध झाले असून सोमवारी अधिकृत घोषणा होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ संपत खिलारी यांनी सांगितले.

श्री दत्त कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवार अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवसाखेर ५३ उमेदवारांनी८३ अर्ज दाखल केले होते त्यापैकी अंतिम दिवस अखेर१८ जागेसाठी २५ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले आहेत तथापि ५३ अर्जापैकी सत्तारूढ गटाचे तीन उमेदवार बिनविरोध झाले तर तर २५ जणांनी माघार घेतली

सत्ताधारी श्री दत्त शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार असे अ वर्ग उत्पादक गटातून विद्यमान चेअरमन गणपतराव पाटील विद्यमान व्हा. चेअरमन अरुण कुमार देसाई अमर यादव अनिलकुमार यादव बाबासो पाटील बसगोंडा पाटील दरगु गावडे ज्योतीकुमार पाटील निजामसो पाटील प्रमोद पाटील रघुनाथ पाटील सिद्धगोंडा पाटील शरदचंद्र पाठक शेखर पाटील विनया घोरपडे विश्वनाथ माने अ वर्ग महिला गटातून अस्मिता पाटील संगीता पाटील तर विरोधीदत्त कारखाना बचाव पॅनलचे उमेदवाराचे संजय चौगुले दरगू चुडमुंगे ज्ञानू जगदाळे भीमराव माने पुंडलिक पाटील सोमनाथ तेली अलका माने असे बिनविरोध उमेदवार ब वर्ग संस्था गटातून विद्यमान संचालक इंद्रजित पाटील व रणजीत कदम यांची तर अनुसूचित जाती जमाती गटामधून सुरेश कांबळे यांची बिनविरोध निवड झाली आहे

दरम्यान सोमवारी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा होणार आहे यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संपत खिलारी व सुनील धायगुडे उपस्थित राहणार आहेत.

# योगेवाडी - मणेराजुरी एमआयडीसीला टेंभूचे पाणी

**तासगाव :** माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांचे स्वप्न असलेल्या बहुचर्चित अशा योगेवाडी - मणेराजुरी एमआयडीसीला टेंभू उपसा सिंचन योजनेचे बिगरशेती वाटपाचे ०.४६५९ द.ल.घ.मी.पाणी देण्याची मागणी शुक्रवारी (दि.१९) रोजी जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता हणमंत गुणाले यांनी मंजूर केली आहे. एमआयडीसी मधील उद्योगासाठी हक्काचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी आमदार सुमनताई पाटील आणि युवा नेते तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सदस्य रोहित आर. आर. पाटील सातत्याने प्रयत्न करत होते. अखेरीस या प्रयत्नांना यश आले आहे. यामुळे आता तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघाच्या मध्यवर्ती ठिकाणी योगेवाडी-मणेराजुरीच्या माळरानावर एमआयडीसी उभी करण्याचे आर.आर. आबांचे स्वप्न आता लवकर पुर्ण होणार आहे.

जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता, यांच्या आदेशात म्हटले आहे, शासन निर्णय क्र.१ अन्वये, बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क प्रस्तावाना मंजूरी देण्यासाठी क्षेत्रीय वाटपाच्या मर्यादेनुसार सुधारित स्तर निश्चित करण्यात आलेले आहेत. सदरच्या निर्णयानुसार सदर प्रस्ताव शासन निर्णयामधील परिच्छेद २.१ मधील तरतुदीनुसार पिण्यासाठी आणि औद्योगिक पाणी वापराच्या बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क प्रस्तावांना मंजूरी देण्याचे अधिकार मा. मंत्री (जसं) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना देण्यात आले आहेत.

त्यानुसारच योगेवाडी - मणेराजूरी या औद्योगिक क्षेत्रास पाणी पुरवठा करणेसाठी टेंभू उपसा सिंचन योजनेतुन पिण्यासाठी ०.०९३२ दलघमी व औद्योगिकरणासाठी ०.३७२७ दलघमी असे एकुण ०.४६५९ दलघमी बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावास महामंडळाने संदर्भीय पत्र क्रमांक ०९ अन्वये मंजुरी प्रदान केल्यानुसार प्रदेश कार्यालय त्याचे खालीलप्रमाणे सविस्तर ज्ञापन निर्गमित करीत आहे.

योगेवाडी - मणेराजूरी औद्योगिक विकास महामंडळ या संस्थेची सदर प्रकल्पातून आतापर्यत घरगुती व औद्योगिक पाण्याच्या वापराकरीता अशी एकुण मागणी ०.६६५ दलघमी इतकी आहे. त्यामध्ये राज्य जल नितीनुसार पुनर्वापर ३० टक्के वापराद्वारे प्रस्तावित असल्याने ते वगळून उर्वरित निव्वळ मागणी ०.४६५९ दलघमी इतकी बिगर सिंचन पाणी आरक्षणाची मागणी मंजूर करण्यांत आली आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०११ यातील कलम ५ मधील १६ (क) (१) नुसार जलसंपत्ती प्रकल्पामधील पाण्याचे क्षेत्रीय वाटप राज्यच्या मंत्रीमंडळ स्तरावरुन करण्याची तरतुद करण्यात आली आहे. त्या तरतुदीनुसार संदर्भीय शासन निर्णय क्र.१ अन्वये राज्यातील पाटबंधारे प्रकल्पातून पिण्यासाठी १५% व औद्योगिकसाठी १०% व सिंचनासाठी ७५% क्षेत्रिय वाटप राज्य मंत्रीमंडळाने निर्धारित केले आहे. यानुसार बिगरशेतीसाठी राखीव असलेल्या २५ % या पिण्याच्या आणि औद्योगिकीकरणाच्या एकूण पाण्यापैकी ०.४६५९ दलघमी पाणी सदरच्या एमआयडीसीसाठी मंजूर करण्यात आले आहे.

योगेवाडी आणि मणेराजुरी हद्दीतील १०१ हेक्टर क्षेत्रावर एमआयडीसी प्रस्तावित आहे. आता योगेवाडी गावाच्या हद्दीत ३२ हेक्टर, तर मणेराजुरी गावाच्या हद्दीतील ६९ हेक्टर अशी जमीन एमआयडीसीच्या ताब्यात आहे. सुरुवातीस योगेवाडी गावाच्या हद्दीतील ३२ हेक्टर जागेवर उद्योग उभारणी होणार आहे, नंतरच्या काळामध्ये मणेराजुरीच्या हद्दीतील एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या जागेवर उद्योगांना परवानगी देण्यात येणार आहे.

## धुराड्याच्या कंपनीला परवाना नाही

**एमआयडीसी सुरु झाल्यानंतर होणाऱ्या प्रदूषणामुळे त्याचा द्राक्षबागांवर गंभीर परिणाम होईल अशी शंका उपस्थित केली जात होती. यावर बोलताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या वरिष्ठ अधिका-यांनी सांगितले की, या भागातील द्राक्ष बागांच्या लागवडीखाल क्षेत्राचा विचार करुन सदरच्या एमआयडीसी मध्ये उद्योगांना परवानगी देत असताना ज्या उद्योगामुळे प्रदूषण होईल तसेच सांडपाणी निर्माण होईल अशा कोणत्याही उद्योगास या ठिकाणी परवाना दिला जाणार नाही. एवढेच नव्हे तर ज्या कंपनीस धुराडे असेल त्या कंपनीला या ठिकाणी परवाना न देण्याचा निर्णय यापूर्वीच झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्याची काळजी करु नये अशी ग्वाही त्यांनी दिली.**

# मीना खोऱ्यातील पाणी प्रश्न सुटणार

## वडज उपसा सिंचन योजनेसाठी शासनाची अखेर मान्यता : ३५ कोटी ५० लक्ष रू. निधी मंजूर

**नारायणगाव:** - जुन्नर, आंबेगाव आणि खेड तालुक्यातील सिंचन प्रकल्पांबाबत सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे गुरुवार दि. १८ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीला खेड तालुक्याचे आमदार दिलीप मोहिते पाटील, जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके, जलसंपदा विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये जुन्नर तालुक्यातील मीना खोऱ्यातील पाणी प्रश्नी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीमध्ये आमदार अतुल बेनके यांच्यासाठी महत्वकांक्षी प्रकल्प असलेल्या वडज उपसा सिंचन योजनेसाठी शासनाने अखेर मान्यता दिली. या योजनेसाठी शासनाकडून ३५ कोटी ५० लक्ष रू. निधी मंजूर करण्यात आला आहे.



या बैठकीबाबत आ. अतुल बेनके म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध सिंचन प्रकल्पांच्या निधीसाठी प्रयत्न चालू होते. यातील एका महत्वकांक्षी प्रकल्पाला आज शासनाने मान्यता दिली. मीना खोऱ्यातील पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी वडज उपसा सिंचन ही महत्वाची योजना आहे. या योजनेच्या सर्वेक्षण कामासाठी देखील मी पाठपुरावा करून निधी मिळवला होता तसेच या भागातील शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधून या योजनेच्या मंजुरीसाठी मी सकारात्मकतेने काम करत होतो. या योजनेसाठी शासनाने ३५ कोटी ५० लक्ष रू. निधी मंजूर करत आज या प्रकल्पाला मान्यता दिली. या योजनेसाठी स्व. वल्लभशेठ बेनके साहेब देखील आग्रही होते त्यांचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकारणार आहे. स्व. बेनके साहेबांनी दाखवून दिलेल्या मार्गावर मार्गक्रमण करत असताना माझ्या कार्यकाळात १०० कोटींची चिल्हेवाडी पाईप लाईन योजना, वडज उपसा सिंचन योजना यासारख्या दीर्घकालीन महत्वकांक्षी प्रकल्पांना मंजुरी मिळवून त्यासाठी निधी देखील उपलब्ध करण्यात यश आले याचे समाधान आज माझ्या मनामध्ये आहे असे आमदार अतुल बेनके यांनी सांगितले.

या योजनेच्या माध्यमातून सावरगाव, वडज, खिलारवाडी, निमदरी, विठ्ठलवाडी, धोंडकरवाडी, काचळवाडी, पाबळवाडी, निळोबाराय नगर यांसह इतर वाड्या वस्त्यांना याचा लाभ होणार आहे. मीना खोऱ्यातील पाणी प्रश्न सुटण्यासाठी मीना खोरे पाणी संघर्ष समिती आणि या भागातील शेतकरी, ग्रामस्थ यांनी देखील मोठा संघर्ष केला या संघर्षाला आज यश आले आहे असे बेनके यांनी सांगितले.

या योजनेच्या मंजुरीबाबत आ. बेनके यांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे जुन्नर तालुक्यातील जनतेच्या वतीने आभार मानले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# डॉल्बीच्या दणदणाटात सर्जा राजांनी अनुभवला बेंदूर सणाचा थरार

## भर पावसात बैलजोड्याची भव्य मिरवणूक

**सातारा :** दरवर्षी आषाढ महिन्यातील मूळ नक्षत्रावर साजरा होणाऱ्या बैल बेंदूर सणाचा उत्साह यावर्षी काही औरच होता. दरवर्षी हा सण भर पावसात साजरा केला जातो याही वर्षी संततधार पावसाने या सणाचा उत्साह मात्र काही कमी झाल्याचे दिसून येत नव्हते. सातारा शहरातील समर्थ मंदिर रोडवरील माने परिवाराने आपल्या घरातील सर्व बैल जोड्या सकाळीच नाऊ माखू घातल्या त्यांना विविध रंगांनी सजवले .त्यांच्या शिंगांना मोरपिसे ,बेगड, जुली घातल्या ,फुलांचे हार घातले आणि त्यानंतर पुरणपोळीचा नैवेद्य दाखवत त्यांना गोडधोड खाऊ घालून सायंकाळी सहा वाजता भर पावसात या सर्जा -राजा आणि ढवळ्या- पवळ्या बैलांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.



बैलांपेक्षा यात सहभागी झालेल्या युवा कार्यकर्त्यांचा उत्साहच अधिक दांडगा होता. तो म्हणजे या मिरवणुकीसाठी आणलेल्या दणदणाटात डॉल्बी सिस्टीमचा विविध रंगांची नकाशी ,लेझर लाईट मधून उतरून मधूनच उडणारे धुराचे फवारे आणि त्यात विविध भाषेतील गाण्यांवर फरकणारी पावले खऱ्या अर्थाने या बैल जोड्यांना मात्र बुजवतच होती .

आपल्या सणाला ही सर्व युवामंडळी नाचून धमाल करत आहेत. मात्र या दणदणाटात आणि कर्कश्य आवाजाने आमची मात्र गाळण उडत असल्याची मनोभावनात हे बैल व्यक्त करताना दिसत होते. हातात वेसण ठरलेल्या आणि या बैलजोड्यांना सावरणाऱ्या माने परिवारातील सदस्यांना मात्र या मिरवणुकीत दणदणाटा मुळे अक्षरशः नाकीनऊ येत होते .

### मावळला अधिकचा निधी मिळत असताना, कोणीही खोडा घालू नये - आमदार शेळके

**मावळ :** मावळलाच सर्वाधिक निधी का दिला जातो, असा मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केल्यामुळे पुण्यात आज झालेल्या जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (डीपीडीसी) बैठकीत आज जोरदार खडाजंगी झाली. मावळचे आमदार सुनिल शेळके यांनी सुळे यांच्या विधानाला तीव्र आक्षेप घेतला. मावळला अधिकचा निधी मिळत असताना कोणीही खोडा घालू नये, या शब्दांत शेळके यांनी त्यांना सुनावले.

उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात झालेल्या जिल्हा नियोजन व विकास समितीच्या बैठकीत हा प्रकार घडला. या बैठकीत बोलताना खासदार सुळे यांनी त्यांच्या भाषणात 'मावळला सर्वाधिक दिला जातो', असा किमान पाच ते सहा वेळा उल्लेख केला. त्यामुळे आमदार शेळके संतापले. बारामतीला जास्त निधी मिळत होता, तेव्हा आम्ही कधी एका शब्दाने बोललो का, असा सवाल करीत त्यांनी थेट सुप्रिया सुळे यांना ठणकावले. आमदार शेळके यांचा रुद्रावतार पाहून आपण मावळ तालुक्याविषयी नाही तर मावळ लोकसभा मतदारसंघाविषयी बोलत असल्याची सारवासारव खासदार सुळे यांना करावी लागली.

# घरकुल उभारणीत सातारा आघाडीवर - याशनी नागराजन

## अधिकारी,कर्मचाऱ्यांचा गुणगौरव : जिल्ह्यात सर्वच योजनांची प्रभावी अंमलबजावणी

**वाई :** केंद्र व राज्य शासनाच्या विविध घरकुल योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी झाली आहे. घरकूल उभारणीत जिल्हा आघाडीवर राहिल्याचे निश्चित समाधान आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी केले.

मोदी आवास घरकुल योजना २०२३-२४ व इतर राज्य आवास योजनांमध्ये उत्कृष्ट व उल्लेखनीय काम केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना गौरवण्यात आले. याप्रसंगी याशनी नागराजन बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संतोष हराळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे, कृषी विकास अधिकारी विजय माईनकर आदी उपस्थित होते.

याशनी नागराजन पुढे म्हणाल्या,घरकुल।पूर्ण झाल्याने त्या कुटुंबाच्या चेहऱ्यावरील।आनंद हा महत्वाचा आहे. हे यश चिरकाळ टिकणारे आहे. घरांची स्वप्न पूर्ण करण्याचे महत्त्वपूर्ण काम जिल्हा करीत आहेत. टिमवर्कने काम केले तर सातत्याने यश मिळते. सातारा जिल्हा सर्वच विकास।योजना यशस्वीपणे राबविण्यात नेहमीच अग्रेसर राहिल्याचा प्रत्येकाला अभिमान आहे.आवास योजनेत उत्कृष्ट काम करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेतील सर्व।संबधित अधिकारी व कर्मचारी यांचा।जिल्हास्तरावर गुणगौरव करण्याची परंपरा।आहे. त्यानुसार ७२ अधिकारी व कर्मचारी यांचा गुणगौरव झाला, ही बाब निश्चितच।अन्य अधिकाऱ्यांना प्रेरणादायी आहे.

महादेव घुले म्हणाले, सातारा जिल्हयाला चांगल्या कामाची परंपरा आहे.विकास।प्रक्रियेतील प्रत्येक घटक आपले कर्तव्य व जबाबदारी म्हणून याकामाकडे बघत असतो. त्यामुळे यश मिळते. सातारा जिल्हा विविध योजना राबवण्यात देशात,राज्यात पुढे असल्याचा निश्चित अभिमान आहे.

संतोष हराळे यांनी आवास योजने अंतर्गत आजअखेर कामाचा आढावा सांगून सातारा।जिल्हा आवास योजनांमध्ये राज्यात सातत्याने अग्रसेर असल्याचे सर्व श्रेय यंत्रणेतील सर्व घटकांचे आहे. आजचे सत्कारमुर्ती ही घराला घरपण देणारी माणसे आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अर्चना वाघमळे म्हणाल्या,घरकुलाच्या लाभासाठी अनेक गरजू व पात्र लाभार्थी भेटत असतात. शासनाच्या विविध आवास योजनांची माहिती देण्यात येते व त्यांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या माध्यमातून घरकुल मंजूरसाठी प्रयत्न केले जात आहेत.

# महाबळेश्वर येथील केट्स पॉइंटवर पर्यटकांची सुरक्षा रामभरोसे

## वन विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष ; पर्यटकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने संरक्षक कठडे बांधण्याची मागणी

सातारा : पर्यटन महाबळेश्वरला अनेक पर्यटक भेटी देत असतात. येथील मनोहरी निसर्गरम्य केट्स पॉइंटवर पर्यटक तासनतास निसर्गाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी रेंगाळत असतात. मात्र याच पॉईंटवर फोटोसेशनचा मोह न आवरल्याने यापूर्वी पॉईंटवर पर्यटकांचा दरीत पडून मृत्यू देखील ओढवला आहे. या पॉईंटवर संरक्षक कठडे उंच नसल्याने अशा दुर्घटना घडत आहेत. सुस्त वन विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे.



महाबळेश्वर येथील हा केट्स पॉईंट पर्यटकांना आकर्षित करणारा पॉईंट म्हणून ओळखला जातो. या पॉईंटवरून धोम धरणाचा जलाशय व बॅकवॉटर त्याचबरोबर सह्याद्रीच्या रांगांचे अनोखे दर्शन व निसर्गाचे विविध रंग या पॉईंटवरून पाहायला मिळतात. त्यामुळे पर्यटक या पॉईंटवर सायंकाळी उशिरपर्यंत तासनतास रेंगाळत राहतात. मात्र पर्यटकांच्या दृष्टीने या पॉईंटवर वन विभागाकडून कोणत्याही सुरक्षा व्यवस्था दिसून येत नाहीत. पॉईंटवरील संरक्षक कठडे हे उंचीने कमी असल्याने या कठड्यांवर उभे राहून पर्यटक फोटोसेशन करीत असतात, अशातून काही दुर्घटना देखील घडल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी संरक्षक कठडे उंच करावेत अशी मागणी अनेकदा पर्यटकांकडून होत असताना देखील सुस्त वन विभाग याकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष करीत आहे . तरी केट्स पॉइंट वरील संरक्षक कठडे उंच बांधण्यात यावेत अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

केट्स पॉइंटवर सायंकाळी सहा नंतर बंदी

महाबळेश्वर मधील केट्स पॉईंट हा पर्यटकांचे प्रमुख आकर्षण असणारा पॉईंट असून या पॉईंट वर वनविभागाच्या नियमानुसार सहानंतर पर्यटँकांना परवानगी नाकारण्यात येते, या पॉईंटवर अवकाळी संयुक्त वन व्यवस्थापन समिती व वन विभाग देखरेख करीत आसते. सायंकाळी सहा नंतर या पॉईंटवर पर्यटकांना परवानगी नाकारण्यात येते तर काही हौशी पर्यटक पॉईंटवर अधिक वेळ बसल्यास सहानंतर पॉईंट बाहेर जाताना त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येते. अनेकदा संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे कर्मचारी हे या पॉईंटवर पैसे घेऊन सहा नंतर देखील पर्यटकांना सोडत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे केवळ नियम हे वन व्यवस्थापन समितीच्या फायद्यासाठी करण्यात आल्याचे दिसून येत आहे. पर्यटकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या केट्स पॉइंटवर वनविभागाने सूर्यास्त सहा नंतर देखील परवानगी द्यावी अशी देखील मागणी होत आहे.

# श्री. छ. अभयसिंहराजे भोसले विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप



**कास पठार :** श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगडच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त श्रीमंत छ. अभयसिंहराजे भोसले विद्यालय व ज्युनि कॉलेज सोनवडी गजवडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

श्री समर्थ एज्यू सोसायटी सोनवडी गजवडी संचलित, श्रीमंत छ अभयसिंहराजे भोसले विद्यालय व ज्युनि कॉलेज सोनवडी गजवडी येथे विद्यालयात इ ५ वी ते १२वी च्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्या एकुण दोन हजार वहींचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी समर्थ सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष योगेश बुवा रामदासी( पुरोहित) म्हणाले किल्ले सज्जनगड परिसरातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती झाली पाहिजे या उद्देशाने सज्जनगड परिसरातील अनेक शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप केले जाते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक कला क्रीडा संस्कृतीक अशा सर्व क्षेत्रातच प्रगती झाली पाहिजे यासाठी पालकांनी व शिक्षकांनी नेहमी सतर्क राहिले पाहिजे. यावेळी समर्थ सेवा मंडळाचे प्रवीण कुलकर्णी, राजाभाऊ कुलकर्णी, महादेव कीर्तन . विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री खामकर सर, विठ्ठल देशमुख सर ,सुतार सर, धर्माधिकारी सर ,गाढवे सर, वेदांते मॅडम ,कदम अश्विनी मॅडम ,काकडे मॅडम शिक्षकेतर कर्मचारी चंद्रकात कदम, अडागळे ,इंगळे यांनी सहकार्य केले समर्थ सेवा मंडळ सज्जनगड यांनी इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केल्या बद्दल सोनवडी गजवडी येथील पालक मान्यवर शिक्षक सर्वांनी कौतुक व्यक्त केले.

### अवैधरित्या दारू विक्री प्रकरणी एकावर कारवाई

**सातारा :** अवैधरित्या दारू विक्री प्रकरणी सातारा तालुका पोलिसांनी एकावर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १८ रोजी संध्याकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास आनंदा विजय पवार रा. कामथी, ता. सातारा हे त्यांच्या राहत्या घराच्या पाठीमागे पत्रा शेडच्या आडोशाला अवैधरीत्या दारू विक्री करताना आढळून आले. त्यांच्याकडून ८४० रुपये किंमतीच्या देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत

### सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १८ रोजी दुपारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास रविवार पेठ, मच्छी मार्केट येथील सिटी सेंटर बिल्डिंग समोर एकमेकांच्या सोबत मारामारी व आरडाओरडा करून सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी विक्रांत उर्फ मनोहर उमेश कांबळे रा. रविवार पेठ सातारा, जय यमन्नाप्पा शितीमनी रा. सदर बाजार सातारा आणि अविनाश कुंदन पवार रा. सदर बाजार सातारा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार पवार करीत आहेत.

### विद्युत खांबावरील तार खाली पडून शॉक लागल्याने शेतकऱ्याचा मृत्यू....

**भोर :** विद्युत खांबावरील तार खाली पडून शेतकऱ्याला शॉक लागल्याने शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. ही दुर्दैवी घटना कापूरहोळ (ता. भोर) गावच्या हद्दीत गुरुवारी (दि.१८) सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान घडली. या घटनेनंतर काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मच्छिंद्र बबन अहिरे (वय ४२ वर्ष, राहणार कापूरहोळ, ता. भोर, जि.पुणे) असे विजेचा शॉक लागुन मृत्यू पावलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. सदर घटनेची नोंद राजगड पोलीस ठाण्यात झाली असून याबाबत फिर्याद मृत्यू पावलेल्याचे चुलत भाऊ गोरक्षनाथ अहिरे यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गोरक्षनाथ याची शेतातील भात लागण दुसऱ्या दिवशी होणार होती. यासाठी गोरक्षनाथ शेतातील गवत काढण्यासाठी गेला असता शेजारील शेतात मच्छिंद्र आडवा पडल्याचे दिसून आले. यादरम्यान मच्छिंद्रच्या हातामध्ये विद्युत खांबावरील खाली पडलेली विजेची तार घट्ट पकडलेली आढळून आली. याची खबर विज महावितरणला दिली असता तात्काळ विद्युत पुरवठा बंद करण्यात आला. मच्छिंद्र यास उपचारासाठी नसरापूर येथील खाजगी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# पीएम किसान ॲपच्या बनावट लिंकद्वारे दुकानदाराच्या बँक खात्यातून ५० हजार लंपास..!

**लोणी काळभोर ::** मोबाईलवर पीएम किसान ॲपची बनावट लिंक पाठवून सायबर भामट्यांनी एका दुकानदाराच्या बँक खात्यातून ५० हजार रुपयांची रक्कम लंपास केली आहे. तसेच मोबाईल हॅक करून घेत नातेवाईकांच्या मोबाईलवर बनावट फोटो पाठवण्यात आल्याची माहिती मिळत आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला आहे.

मिळलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा १७ वा हप्ता नुकताच डीबीटीद्वारे वितरीत करण्यात आला आहे. तसंच १८व्या हप्त्याची यादी देखील पीएम किसान योजनेच्या अधिकृत वेबसाईटवर आता प्रकाशित करण्यात आली. या संधीचा फायदा घेत अज्ञात सायबर भामट्यांनी पीएम किसान योजनेची बनावट ॲप लिंक बनवली व ती काही ठराविक ग्रुपवर शेअर केली.

कुंजीरवाडी ग्रामपंचायत विजय गायकवाड व सागर तुपे हे मोबाईलवर व्हॉटसॲप चालवत असताना त्यांना एका ग्रुपमध्ये पीएम किसान ॲपची लिंक दिसून आली. यावेळी गायकवाड यांनी ही लिंक ओपन केली यावेळी त्यांचा मोबाईल हॅक करण्यात आला व व्हॉट्सॲपचा ताबा सायबर भामट्याने घेतला व ती लिंक नातेवाईक व त्यांच्या मोबाईलमध्ये असेलेल्या ग्रुपवर पाठवण्यात आली. यावेळी विजय गायकवाड व त्यांच्या काही नातेवाईकांनी मोबाईलच्या व्हॉटसॲपवर आलेले ॲप्लिकेशन मोबाईलमध्ये ओपन केले.

यावेळी नातेवाईकांनी फोन करून गायकवाड यांना त्यांच्या बाबत घडलेली माहिती दिली की, यावेळी गायकवाड यांनी मोबाईल हॅक झाला व त्यांच्या मोबाईल मधील सर्व व्हॉटसॲप, व इतर डेटा हा आपोआपच दुसऱ्याणा पाठवला जात असल्याची माहिती दिली. आपली फसवणूक झाली असल्याचे गायकवाड व त्यांच्या नातेवाईकांच्या लक्षात आल्यावर गायकवाड यांनी सर्व नातेवाईकांना याची माहिती दिली.

गायकवाड फोन करीत असतानाच त्यांना पुण्यातील दुकानदाराचे ५० हजार रुपयांची सायबर चोरट्याने फसवणूक करून बँक खात्यातून काढून घेतले होते. तर काही नागरिकांचे मोबाईल हॅक करून त्या नातेवाईकांचे अश्लील फोटो बनवून नातेवाईकांना पाठवण्यात आले. याप्रकरणी गायकवाड यांनी तातडीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलीस अधिकारी संभाजी देवीकर यांनी तातडीने दखल घेऊन हॅकरचा ॲक्सिस तोडला.

याबाबत बोलताना विजय गायकवाड म्हणाले, मोबाईलवर येणारी पीएम किसान ॲपची बनावट लिंक असून कोणीही अशा लिंक अथवा ॲप उघडू नये त्यामुळे तुमची व तुमच्या नातेवाईकांची फसवणूक होऊ शकते.

# १० वर्षांत पर्यटक दुप्पट वाढतील, एक लाख कोटींची गुंतवणूक : गिरीश महाजन



**मुंबई :** महाराष्ट्राच्या पर्यटनाचा चेहरामोहरा बदलण्याची क्षमता असलेले नवे पर्यटन धोरण महायुती सरकारने आणले असून, त्याद्वारे येत्या दहा वर्षांत राज्यातील पर्यटकांची संख्या दुप्पट होईल आणि एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक या क्षेत्रात होईल, असा विश्वास राज्याचे पर्यटन व ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला. पर्यटनाच्या क्षेत्रात उतरू इच्छिणाऱ्या लहानमोठ्या व्यक्त्ती/व्यावसायिक / कंपन्या यांना भरभरून आर्थिक प्रोत्साहन देण्याची तरतूद या धोरणात आहे. मला वाटते की फायनान्शियल इन्सेंटिव्ह' म्हणजे आर्थिक प्रोत्साहन हाच या धोरणाचा गाभा आहे. पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या लोकांनी इतर राज्यांऐवजी महाराष्ट्रातच यावे यासाठी जाणीवपूर्वक तशी भूमिका घेण्यात आली आहे.

# सरकारची लाडका मित्र योजना, मुंबईला अदानी सिटी होऊ देणार नाही : उद्धव ठाकरेंचा इशारा

**मुंबई :** धारावीकरांना जागेवरच ५०० चौ.फुटाचे घर मिळाले पाहिजे. मात्र धारावीचा भूखंड अदानीच्या घशात घालून मुंबईला अदानी सिटी करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा डाव आहे. सरकारची लाडका मित्र किंवा लाडका कॉंट्रॅक्टर किंवा लाडका उद्योगपती योजना सुरु आहे. मात्र एकाही धारावीवासियाला तिथून हाकलू देणार नाही. मुंबईला अदानी सिटी होऊ देणार नाही असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी पत्रकार परिषद दिला.यावेळी आदित्य ठाकरे, संजय राऊत आणि सुभाष देसाई पत्रकार परिषदेत उपस्थित होते.

उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना लाडका भाऊ लाडकी बहीण योजनेवर टीका केली. निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून सरकार फसव्या योजनांचा पाऊस पाडत आहे.त्यांना वाटतंय की योजनांना लोक भुलतील. गेल्या वर्षी आम्ही धारावीत मोर्चा काढला होता.आमची मागणी आहे की, तिथेच धारावीकरांना पाचशे स्क्वेअर फुटांचे घर मिळालंच पाहिजे, ही आमची मागणी आहे, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

मुंबईला अदानी सिटी बनवण्याचे काम सुरू आहे.मुंबईत लुटून भिकेला लावायचे यांचे काम सुरू आहे. टेंडरमध्ये नसलेल्या गोष्टी अदानीला दिल्या जातायत.५९० एकरची जागा आहे. आता एफएसआयचा वर्षाव सुरू केलाय. धारावीकरांना अपात्रतचे निकष लावून बाहेर काढले जातायत. नागरी संतुलन बिघडवण्याचा प्रयत्न केला जात आहे. कुर्लाची मदर डेअरी,दहीसर टोलनाका, मुलूंडची जागा, मिठागरेसह २० जागा अदानीला दिल्या जातायत. लाडक्या मित्रासाठी जागा दिल्या जात आहेत, असा घणाघात उद्धव ठाकरेंनी केला आहे.

धारावी केवळ झोपडपट्टी नसून तिथे एक इंडस्ट्रियल इस्टेट आहे. तिथे प्रत्येक घरांत मायक्रोस्केल उद्योग चालतो. त्यात कुंभार आहेत.

## मुंबईला अदानी सिटी बनविणे हा सत्ताधाऱ्यांचा डाव: उद्धव ठाकरे यांचा आरोप

**मुंबई :** धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या बदल्यात निविदेमध्ये नमूद नसलेल्या गोष्टी, बेसुमार टीडीआर, दहिसर नाका, कुर्ल्याची मदर डेअरीची जागा आणि मुलुंडच्या मिठागरांच्या जागा अदानींच्या घशात घालून मुंबईची अदानी सिटी करण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव असल्याचा आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे कार्यप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. धारावीच्या पुनर्वसनाच्या नावाखाली तब्बल ५९० एकर जमीन अदानी समूहाला मिळणार आहे. धारावी ही केवळ झोपडपट्टी नाही. टी एक मोठी औद्योगिक वसाहत आहे. त्या ठिकाणी घराघरात सूक्ष्म उद्योग चालतात. धारावीतील प्रत्येकाला धारावीमध्येच ५०० चौरस फूट जागा मिळाली पाहिजे. अन्यथा हा प्रकल्प होऊ दिला जाणार नाही, असा इशाराही ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिला. पात्र, अपात्रतेच्या नावाखाली धारावीवासीयांना बाहेर काढण्याचे प्रयत्न केले जात आहेत. हा मुंबईचे नागरी संतुलन बिघडविण्याचा प्रयत्न असून तो आम्ही चालू देणार नाही.

# छत्रपती शिवरायांचे राष्ट्रीय स्मारक उभारले जावे

## राज्य शासनाने पुढाकार घेण्याची खासदार उदयनराजे भोसले यांची मागणी

**सातारा :** छत्रपती शिवरायांनी सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला त्यातूनच रयतेचे राज्य निर्माण झाले भारतीय राज्यघटनेने घालून दिलेल्या लोकशाहीमध्ये सर्वधर्मसमभावाची बीजे दिसतात मात्र छत्रपती शिवरायांचे तत्कालीन साहित्य यावरून वारंवार विनाकारण वाद निर्माण केला जातो कृपया हे थांबवावे छत्रपती शिवरायांचे अधिकृत शिवचरित्र राज्य शासनाने प्रकाशित करून त्यांचे राष्ट्रीय स्मारक दिल्ली येथे उभे करण्यासंदर्भात राज्य शासनाने पुढाकार घ्यावा अशी आग्रहीची मागणी खासदार उदयनराजे भोसले यांनी केली.

शिवकाळातील ऐतिहासिक वाघ नखांचे अनावरण आणि छत्रपती शिवाजी संग्रहलयाचे उद्घाटन या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात उदयनराजे बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मनगुंटीवार, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार महेश शिंदे, आमदार जयकुमार गोरे भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

खासदार उदयनराजे भोसले पुढे म्हणाले राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने लंडन येथील विक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयातील ऐतिहासिक वाघनखे साताऱ्यात आणली गेली त्याबद्दल राज्य शासनाचे खरोखर अभिनंदन आहे ही वाघनखे साताऱ्याच्या शिवाजी संग्रहालयात ठेवली जात आहेत हा सातारकरांसाठी अभिमानाचा क्षण आहे .छत्रपती शिवरायांचा सर्वधर्मसमभाव हेच भारतीय लोकशाहीचे मूळ बीज आहे मात्र छत्रपती शिवरायांच्या साहित्यावरून वारंवार वाद निर्माण केला जाणे हे चुकीचे आहे. छत्रपतींनी स्वराज्य उभारणीमध्ये मोठे योगदान दिले त्यामुळे त्यांच्या संपूर्ण जीवनाचा ऐतिहासिक आढावा घेऊन त्यांचे अधिकृत शिवचरित्र प्रकाशित केले जावे आणि भारताची राजधानी असणाऱ्या दिल्ली येथे त्यांचे राष्ट्रीय स्मारक उभे केले जावे

याकामी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा अशी मागणी उदयनराजे यांनी केली

आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सुद्धा राज्य शासनाचे अभिनंदन केले .ऐतिहासिक वाघनखांचे दर्शन साताऱ्यातील शिवाजी संग्रहालयामध्ये होत आहे याचा आम्हाला अभिमान आहे यासाठी राज्य शासनाचे अभिनंदन करावे तितके थोडेच आहे असे ते म्हणाले छत्रपती शिवरायांची वाघनखे हा त्यांच्या शौर्याचा अभिमान आणि प्रतीक आहेत या वाघनखांचे सातारकरांनी अवश्य दर्शन घ्यावे असे आवाहन त्यांनी केले.

# सातार्‍याच्या दौर्‍यामध्ये अजितदादांची विधानसभेची राजकीय पेरणी

## जिल्हास्तरीय पदाधिकार्‍यांशी चर्चा आणि कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश

**सातारा :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शुक्रवारी सातारा जिल्ह्याच्या दौर्‍यामध्ये विधानसभेची पेरणी सुरू केली आहे. येथील पोवई नाक्यावरील राष्ट्रवादी कार्यालयांमध्ये अजित दादांनी जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर व कार्याध्यक्ष अमित कदम तसेच निवडक पदाधिकार्‍यांची बैठक घेऊन कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले तसेच पक्षाची संघटनात्मक बांधणी आणि मतदारसंघाच्या सर्वेक्षणानंतर इलेक्टिव्ह मेरिट च्या उमेदवारांचा शोध हा अजित दादांनी रडारवर घेतला आहे.

याशिवाय राष्ट्रवादीच्या विस्तारित कामा संदर्भात त्यांनी पदाधिकार्‍यांशी चर्चा केली. अजित दादा पवार हे गुरुवारी रात्री मुक्कामी सातार्‍यात होते. कार्याध्यक्ष अमित कदम यांच्या घरी स्नेहभोजन घेतल्यानंतर दादा शासकीय विश्रामगृहांमध्ये रवाना झाले. अजित दादा यांच्याकडे अमित कदम मित्र



समूहाच्या वतीने त्यांना विधान परिषदेवर संधी देण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली होती. शुक्रवारी सकाळी येथील राष्ट्रवादी कार्यालयाच्या दालनामध्ये अजित दादांनी जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकार्‍यांची बैठक घेतली या बैठकीला जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष नितीन काका पाटील, कार्याध्यक्ष अमित कदम चिटणीस श्रीनिवास शिंदे, वैद्यकीय सहाय्यता कक्ष राज्य उपाध्यक्ष सागर भोगावकर इत्यादी यावेळी उपस्थित होते.

अजित दादा पवार यांनी सातारा जिल्ह्यामध्ये संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याचे निर्देश पदाधिकार्‍यांना दिले आहेत.

शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुणे येथे बैठक घेऊन वाई विधानसभा मतदारसंघांमध्ये आमदार मकरंद पाटील यांच्या विरोधात तगडा उमेदवार शोधण्याची रणनीती निश्चित केली आहे .या संदर्भाने अजित दादांनी सुद्धा सातार्‍यात तळ देऊन उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. बारामती येथे झालेल्या जन्मसन्मान मेळाव्यामध्ये दादांनी विधानसभेचे रणशिंग फुंकले आहे त्याचा पहिला टप्पा पिंपरी चिंचवड येथे शनिवारी होणार्‍या पहिल्या मेळाव्यातून होणार आहे. त्यानंतर पुढील महिन्यांमध्ये सातारा जिल्ह्यातही असाच मेळावा घेऊन प्रत्यक्ष तयारीचे संकेत दिले जातील असा अंदाज आहे. अजित दादांनी कार्यकर्त्यांना संघटनात्मक बांधणी करा व पक्ष रचना मजबूत करा असे स्पष्ट केले तसेच सातारा जिल्ह्यामध्ये पक्ष बांधणी मजबूत करून हाय मेरिटचे उमेदवार शोधणे हा पुढील अजेंडा असणार आहे.

अजित दादा पवार या संदर्भात म्हणाले महायुतीच्या बैठकीमध्ये २८८ मतदार संघाच्या सर्वेक्षणाप्रमाणे राजकीय ताकतीचा अंदाज घेऊन त्या त्या कार्यक्षेत्रामध्ये विधानसभेचे उमेदवार निश्चित केले जातील. त्या दृष्टीने सातारा जिल्ह्यात पक्ष बांधणी मजबूत असेल तर जास्त जागांवर मागणी करणे शक्य होणार आहे त्यासाठीच सदस्य नोंदणी पासून ते जिल्ह्यातील बूथ रचनेपर्यंत कार्यकर्त्यांची साखळी उभी राहिली पाहिजे असे दादांनी निर्देश दिल्याचे कार्याध्यक्ष अमित कदम यांनी सांगितले.

राष्ट्रवादी कार्यालयाचा होणार विस्तार

पोवई नाक्यावरील राष्ट्रवादी कार्यालयाचा विस्तार करण्याचे निर्देश अजितदादा पवार यांनी पदाधिकार्‍यांना दिले. कार्यालयासमोर मोठा उतार असल्याने ती जागा उचलून तिथे पायर्‍यांचे टप्पे करणे, नागरिकांना वेटिंग रूम, प्रसाधनगृह, पार्किंगची व्यवस्था इं सुविधा निर्माण करण्याचे निर्देश दिले. बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता नितीन खैरमोडे यांच्याशी अजितदादांनी संपर्क साधून कामे दर्जेदार करण्याच्या सूचना दिल्या.

# पांडुरंग भोसलेंनी शेतकर्‍याच्या हितासाठी काम करावे - आ. जयंत पाटील




कोरेगाव : ॲड. पांडुरंग भोसले यांनी आपल्या पदाचा उपयोग शेतकर्‍यांच्या हितासाठी करावा असे मत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी व्यक्त केले.

जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने कोरेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल परदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आ. शशिकांत शिंदे, आ. बाळासाहेब पाटील,जिल्हाध्यक्ष सुनील माने उपस्थित होते.

आ. जयंत पाटील म्हणाले, आ. शशिकांत शिंदे यांनी ॲड. पांडुरंग भोसले यांची केलेली निवड सार्थ आहे. ॲड. पांडुरंग भोसले यांनी आपल्या सभापतीपदाचा उपयोग कोरेगाव तालुक्यातील शेतकर्‍यांच्या हितासाठी करावा. यासाठी आपणही त्यांना सर्व ती मदत करू. याचबरोबर ॲड. पांडुरंग भोसले हे राष्ट्रवादीचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसची ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करावा.

आ. शशिकांत शिंदे म्हणाले, ॲड.पांडुरंग भोसले हे निष्ठेने पक्षाबरोबर राहिले आहेत. कोरेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत ते विक्रमी मतांनी विजयी झाले आहेत. शेतकर्‍यांच्या हिताच्या प्रश्नावर ते सध्या उत्तम काम करत आहेत.त्यांना आमदार म्हणून मी लागेल ते सहकार्य करणार आहे.

# सोनू सूद यांनी आंध्र प्रदेशातील एका मुलीच्या शिक्षणाला दिला पाठिंबा

सोनू सूदचे हा कायम त्याचा वैविध्यपूर्ण भूमिका आणि समाज कामासाठी चर्चेत असतो. अलीकडच्या एका कृतीने तो राष्ट्रीय नायक का मानला जातो हे पुन्हा सिद्ध केले आहे. आंध्र प्रदेशातील एका विद्यार्थ्याला तिचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी मदत करण्यासाठी त्याने सोशल मीडिया वापरकर्त्याने जनतेच्या नायकाशी संपर्क साधला.

राष्ट्रीय नायकाने ट्विट करताच अभिनेत्याच्या अनेक फॅन्स ने दयाळूपणाबद्दल टिप्पणी आणि प्रशंसा केली. एका कमेंटमध्ये लिहिले आहे, सोनू सूद, तू दयाळू मनाचा माणूस आहेस. सर्वशक्तिमान तुला आशीर्वाद देवो इतर अनेकांनी जनतेच्या नायकाची प्रशंसा केली.

# माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांच्या माध्यमातून आणखी ३० पाण्याचे टँकर कराड शहराच्या सेवेला

**कराड :** कराड शहराचा पाणी प्रश्न वाढत असून अशी आणीबानी याआधी क्वचित निर्माण झाली असावी पण सद्या हा पाणी प्रश्न मोठा निर्माण झाला आहे. याचमुळे सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांच्या सहकार्याने कराड शहरासाठी आणखी २० पिण्याच्या पाण्याचे टँकर शहरवासियांसाठी दाखल झाले आहेत. पाणी प्रश्न परिस्थिती निर्माण झाली त्यावेळी कराड शहरात १० टँकर सेवेत होते पण आता आणखी २० टँकर कराडच्या पाणी प्रश्न आपल्या परीने मिटविण्यासाठी कराडकरांच्या सेवेसाठी उपलब्ध केले आहेत. पिण्याच्या पाण्याचे टँकर किमान ४००० लिटरचे असून एकूण ३० टँकर च्या माध्यमातून कराड शहराला दररोज १ लाख २० हजार लिटर पाणी उपलब्ध होत आहे. यासाठी माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम यांचे सहकार्य मिळाले आहे.

कराड शहरासाठी पाणी पुरवठा करणारी मुख्य पाईप लाईन नदीच्या पाण्यातून वाहून गेली असल्याने कराड शहराला होणारा पाणीपुरवठा खंडित झाला आहे. याचं परिस्थितीवर राज्याचे माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी तातडीने पालिका अधिकारी तसेच प्रांतधिकारी, हायवेचे अधिकारी व चत्रझ्र चे अधिकारी यांची संयुक्तिक मिटिंग घेऊन प्रमुख ५ सूचना केल्या होत्या. त्या सूचनांची



काही प्रमाणात अंमलबजावणी पालिका प्रशासनाकडून झाली आहे. पण तरीसुद्धा कराड शहराचा पाणी प्रश्न गंभीर होत गेल्याने आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी पलूस कडेगाव चे आमदार डॉ. विश्वजीत कदम यांना संपर्क करून त्यांना अतिरिक्त पाण्याच्या टँकर ची मागणी केली त्यानुसार डॉ. विश्वजित कदम यांच्याकडून २० पाण्याचे टँकर तातडीने पाठविण्यात आले. त्यानुसार आधी कराडमध्ये सेवा देत असलेले १० टँकर सहित आणखी २० टँकर असे ३० पिण्याच्या पाण्याचे टँकर मलकापूर पाणी योजनेतून भरून कराड शहरासाठी सेवेसाठी दाखल झाले आहेत.

# जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील धरणांमध्ये एकूण ६२.३१ अब्ज घन फूट (टिएमसी) पाणी साठा असल्याचे उपकार्यकारी अभियंता, कृष्णा सिंचन विभाग, सातारा यांनी कळविले आहे.

जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा पुढीलप्रमाणे असून सर्व आकडे अब्ज घन फूटमध्ये आहेत. कंसामध्ये धरणसाठ्याची टक्केवारी दिली आहे.

मोठे प्रकल्प -

कोयना ४३.५३ (४३.४८), धोम ३.८३ (३२.७६), धोम-बलकवडी १.१४ (२८.२९ड़), कण्हेर ३.८४ (४0.0४), उरमोडी २.६३ (२७.२५), तारळी २.६७ (४५.७२).

मध्यम प्रकल्प -

येरळवाडी 0.२३0 (३३.२४), नेर 0.0७३ (१७.५५), राणंद 00, आंधळी 0.0५0 (१९.0८), नागेवाडी-0.0५९ (२८.१0), मोरणा 0.८६0 (६६.१५), उत्तरमांड 0.४८७ (५६.0८), महू 0.८२२ (७५.४३), हातगेघर 0.११७ (४६.८0), वांग (मराठवाडी) १.९६९ (७२.३९) या प्रमाणे पाणीसाठा आहे.

# जिद्द व चिकाटी हेच खरे यशाचे गमक शिक्षणाधिकारी अनिस नायकवडी



**उंडाळे :** जिद्द व चिकाटी हेच खरे यशाचे गमक आहे असे प्रतिपादन सातारा जिल्हा शिक्षणाधिकारी (योजना) अनिस नायकवडी यांनी केले

कोळे ता. कराड येथील श्री संत घाडगेनाथ हायस्कूलमध्ये आयोजित प्रशासकीय अधिकारी म्हणून निवड झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते सत्काराला उत्तर देताना बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक आजीव सेवक बी. एच. सपकाळ होते. तर प्रमुख पाहुणे आजीव सेवक ,माजी प्राचार्य अशोक माने होते.

नायकवडी पुढे म्हणाले माझ्या यशस्वी जीवनामध्ये या शाळेचा व शिक्षकांचा खूप मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटीच्या जोरावर आपल्या आयुष्याचा यशस्वी प्रवास करावा यावेळी आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ नायकवडी यांनी इयत्ता दहावीमध्ये येणार्‍या प्रथम तीन क्रमांकांना अनुक्रमे रूपये ५000, ३000 व २000 या रोख रकमेचे बक्षीस जाहीर केले

कार्यक्रमाच्या सुरुवातीस शिक्षणाधिकारी अनिस नायकवडी, महिला बालकल्याण अधिकारी विश्वजीत देसाई व सहाय्यक वाहतूक निरीक्षक अनिल लटके यांची गावातून रथातून मिरवणूक काढण्यात आली

# डेंग्यूला वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे : मुख्याधिकारी

**कोरेगाव :** डेंग्यू हा विषाणूपासून होणारा आजार असून त्याचा प्रादुभाव थांबविण्याकरीता विशेष डेंग्यू आजाराच्या प्रतिबंधाकरीता रहिमतपूर शहरात सर्व ठिकाणी फॉगिंग मशीनद्वारे धुराची फवारणीचे काम पूर्ण करण्यात आले असून आवश्यकतेनुसार दैनंदिन धूर फवारणी करण्यात येत आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. नगर परिषदेच्या एकूण ७ पथकाद्वारे दैनंदिन कंटेनर सर्वेक्षण पूर्ण करण्यात येत असून नागरिकांनी घर व परिसरात साठलेल्या स्वच्छ पाण्याचे स्तोत्र स्वच्छ करावेत व नागरिकांनी आठवड्यातून एकदा कोरडा दिन पाळण्याचे आवाहन रहिमतपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे यांनी केले आहे.



डेंग्यू पसरवणार्‍या अळ्या किंवा एडिस इजिप्टाय प्रजातीचे डास साचलेल्या स्वच्छ पाण्यात तयार होतात. त्यामुळं डेंगू साथ नियंत्रित आणण्यासाठी सर्वत्र प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांनी घरातील ए.सी, फ्रीज, फुलदाण्या, कुलर, कुंडया, बादल्या, जुने टायर, पाणी साठवून भांडी रिकामी करून स्वच्छ करावेत. जी भांडी रिकामी करणे शक्य नाहीत अशा भांड्यामध्ये टेमिफॉस अळी नाशक टाकावे. शहरात सुरू असलेल्या विविध ठिकाणच्या बांधकामासह घर, छत व भोवतालचा परिसर स्वच्छ ठेवा. खूप दिवस पाणी जमा होणार नाही याची काळजी घ्या.

डेंग्यूचे डास सामान्यता दिवसाच चावतात त्यामुळे तुमच्या आजूबाजूला पाणी साचलेल्या ठिकाणी जाणं टाळावच. घराच्या खिडक्यांना जाळी लावणे, शक्यतो दार, खिडक्या बंद ठेवणे अशा प्रकारे सर्वेक्षणामध्ये नागरीकांना नगर परिषदेच्या टीमद्वारे सूचना व आरोग्य विषयक माहिती देण्यात आली आहे.

तसेच रहिमतपूर नगरपरिषद हद्दीतील सर्व रस्ते व गटारे यांची स्वच्छता नियमित करणेत येत आहे. त्याचप्रमाणे विशेष पाणी साठे नळाच्या पाण्याकरीता बांधणेत आलेल्या सिमेंटच्या टाक्या,

भूगित पाणी साठ, पाणी साठवण टाक्या, बॅलर यांचा विशेष सह करुन त्या झाकणेबाबत नागरीकांना सूचना करणेत आलेल्या आहेत. तसेच कंटेनर सहेक्षण मध्ये आढळून आलेल्या भागात नागरीकांना आरोग्य विषयक माहिती देऊन पाणी साठवण्याचे हौद, टाक्या, बॅलर इ. आठवडयातून किमान एकदा घासुन पुसुन स्वच्छ करणेबाबत सूचना देणेत आलेल्या आहेत. तसेच नागरीकांना आठवडयातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा म्हणून आवाहन करण्यात आले आहे.

# स्टोन क्रशर बंद करावा असा जिल्हाधिकार्‍यांचा आदेश नाही

## सर्व परवानग्या असूनही क्रशर सुरू करता येत नाही - अश्विनी सावंत

**वाई :** कुसगाव (ता. वाई) येथील क्रशर बंद करावा असा कोणताही आदेश जिल्हाधिकारी यांनी केलेला नसून खोडसाळपने काही समाजकन्टक प्रशासन व वृत्तपत्रांची दिशाभूल करून खोट्या बातम्या देत आहेत. यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत असून शासनाच्या परवानगी असतानाही क्रशर सुरु करता येत नाही. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील सुरु असून योग्य तो निर्णय त्यावर होणार असल्याची माहिती क्रशरच्या मालक अश्विनी विजय सावंत यांनी दिली आहे.

कुसगाव ता. वाई येथील क्रशर सुरु करण्यासाठी लागणार्‍या सर्व प्रशासकीय परवानग्या घेतल्यानंतरच क्रशिंगचे काम सुरु करण्यात आले होते. कुसगाव येथील गट न. ७३९/२/१ मध्ये साताराचे जिल्हाधिकारी यांनी गौण खनिज क्रमांक १४/एस/आर/ २९२/२०२२ याने दि. १२/१२/२०२२ रोजी खान भाडेपट्टा आदेश दिला आहे. मात्र काही समाजकंटकांनी वैयक्तिक स्वार्थासाठी याला विरोध करून तो बंद पाडण्याचा प्रयत्न सुरु केला. कुसगाव, व्याहळी,एकसर, पार्टेवाडी येथील काही ग्रामस्थांची दिशाभूल करून त्यांना चुकीची माहिती देऊन त्यांना पुढे करून क्रशरकडे जाणारा रस्ता बंद करण्याचा प्रयत्न केला. निव्वळ स्वतःच्या स्वार्थासाठी भोळा भाबड्या ग्रामस्थांचा उपयोग करून घेण्यात येत आहे. आमचे आर्थिक नुकसान होत असल्याने नाईलाजाने आम्हाला सदर ग्रामस्थांवर गुन्हे दाखल करावे लागले.याच्यामागील करता करविता मात्र नामा निराळा राहत असून प्रसारमाध्यमे हाताशी धरून ग्रामस्थांची डोकी भडकवण्याचे काम व समाजात चुकीच्या बातम्या पसरवण्याचे काम करीत आहे.

हा सर्व प्रकार आम्ही तहसीलदारांच्या लक्षात आणून दिला. तसेच काही सुज्ञ ग्रामस्थांनाही हा होणारा प्रकार लक्षात आल्याने २२/४/२०२४ रोजी त्यांनी तहसीलदार यांच्याकडे गट नं. ७५ पासून कुसगाव पर्यंत जाणारा पूर्वीपासून पाचगणी पाणीपुरवठा रस्ता सार्वजनिक वहीवाटीसाठी खुला करण्याची विनंती केली. त्यानुसार तहसीलदार यांनी सर्व कागदपत्रांची शहानिशा करून सदर क्षेत्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाचगणी विभाग यासाठी भूसंपादित झालेली असल्याने व सदर जमिनीतून सार्वजनिक वहीवाटीचा रस्ता व्याहळी मार्गे गट नं. ७५ पासून कुसगाव पर्यंत असल्याने व त्याची आवश्यकता शेतकर्‍यांना व ग्रामस्थांना असल्यामुळे पोलीस प्रशासनाची मदत घेऊन सदर रस्ता खुला केला होता. सदर रस्त्यावर डोंगरी विकास कार्यक्रम २०१३-१४ अंतर्गत खडीकरणही करण्यात आलेले होते. या सर्व कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतरच तहसीलदार यांनी हा रस्ता खुला केला होता. आम्ही ग्रामस्थांना कधीच विरोधासाठी विरोध केला नाही. आम्ही ग्रामस्थांबरोबर कायमच संयमाची व तडजोडीची भूमिका घेतली आहे. मात्र ग्रामस्थांची दिशाभूल करून त्यांना चुकीची माहिती देत ब्लॅक जेम स्टोन क्रशर बंद पाडण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे सुनावणी लवकरच सुरु होणार आहे. मात्र तत्पूर्वीच प्रशासनावरती दबाव आणण्यासाठी प्रसार माध्यमांना खोटी माहिती देऊन चुकीच्या बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. मात्र कोणत्याही दबावाला बळी न पडता जिल्हाधिकारी योग्य तो निर्णय नक्कीच घेतील व आम्हाला न्याय मिळवून देतील याची पूर्ण खात्री आम्हाला असल्याचेही त्यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# कांदाटी खोर्‍यातील गावांसाठी रूग्णवाहिकेचा प्रस्ताव

## दिशा विकास मंचचे अध्यक्ष सुशांत मोरे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**सातारा :** कांदाटी खो-यातील रुग्णवाहिका प्रश्नी माहिती अधिकार, सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले असून. उपोषण स्थगित करताना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे प्रश्न सोडवावा अशी मागणीही श्री. मोरे यांनी केली आहे.

माहिती अधिकार, सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी सह्याद्री वाचवा मोहीम अंतर्गत सर्वसामान्यांना जनतेला लोकशाही पध्दतीने आंदोलन करुन न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या अशाच एका आंदोलनाला यश मिळाले असून कांदाटी खो-यातील १६ गावांसाठी रुग्णवाहिका मंजूर झाली आहे. त्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक सातारा यांनी सदरचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आहे.

कांदाटी खो-यातील १६ गावांसाठी रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन द्यावी यासाठी श्री.मोरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १० जुनपासून बेमुदत उपोषण सुरु केले होते. त्यावेळी याबाबत केंद्र व महाराष्ट्र शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन संबंधित विभागांने दिल्यानंतर मोरे यांनी बेमुदत उपोषण स्थगित केले होते. त्यानुसार जिल्हा शल्यचिकित्सकांनी तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्र तापोळा येथे १०२ ची एक रुग्णवाहिका, १०८ ची एक रुग्णवाहिका, प्राथमिक आरोग्य केंद्र तळदेव येथे १०२ ची एक रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली आहे. तसेच १०८ च्या आणखी रुग्णवाहिकांसाठी राज्यस्तरावर मागणी केल्याचे पत्र जिल्हा शल्यचिकित्सकांनी श्री. मोरे यांना दिले आहे. त्यामुळे श्री. मोरे यांनी केलेल्या आणखी एक आंदोलनाला यश मिळाले असून या रुग्णवाहिकांच्या उपलब्धतेमुळे कांदाटी खो-यातील ग्रामस्थांचा आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांनी लक्ष घालण्याची मागणी

जिल्हयाचे सुपुत्र असणा-या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जन्मभूमी कांदाटी खो-यातच आहे. भूमिपुत्र या नात्याने त्यांनी या भागात सुधारणा करण्यास सुरुवात केली असली तरी १०८ ची रुग्णवाहिका तातडीने मिळण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी लक्ष घालण्याची मागणी श्री. सुशांत मोरे यांनी आज समक्ष निवेदनाने केली आहे.